महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२५/ 2669
दिनांक :- 24 SEP 2025

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विना-अनुदानित
पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- दि. २८ सप्टेंबर हा दिवस "आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करणेबाबत.**

**संदर्भ:-** १.राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे पत्र क्र. रामाआ/अमरावती/प्र.क्र.१९/२०२५/आस्था/५५६७, दिनांक ०९/०९/२०२५
२. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती यांचे पत्र क्र.कक्ष-८/मा.अ/कावि-५६/२०२५, दिनांक २३/०९/२०२५

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रान्वये सर्वसामान्य लोकांमध्ये जनजागृती होणेसाठी प्रत्येक वर्षी २८ सप्टेंबर रोजी माहिती अधिकार दिन साजरा करण्यात येतो. तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ४ नुसार सर्व शासकीय , निमशासकीय कार्यालयामध्ये १७ मुद्यांबाबत माहिती तसेच कार्यालयाशी संबंधित प्रदर्शित करण्यायोग्य सर्व माहिती कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेबाबत सर्वोच्च न्यायालयानेही आदेशित केले आहे. माहिती अधिकार दिनामितीत्त दरवर्षी जनजागृती मोहिम म्हणून आपल्या संस्थेत संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने साजरा करण्यात यावा. सुलभ माहितीकरिता संदर्भीय पत्र सोबत जोडले आहे.

संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने आपण आपल्या स्तरावर केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल तात्काळ या कार्यालयास न चुकता सादर करावा.

**माहिती अधिकार दिवस हा सार्वजनिक सुटटीच्या दिवशी (रविवार) येत असल्याने सदर दिवस अगोदरच्या कार्यालयीन दिवशी किंवा नंतरच्या कार्यालयीन दिवशी साजरा करावा.**

सहपत्र :- वरील प्रमाणे.

(मनोज म. अंधारे)
**प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्राशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी कार्यालय,
कॅम्प रोड,अमरावती-४४४६०२

☎:-०७२१-२६६२०२५
☎:-०७२१-२६६२४१३
E-Mail ID :- rdc.amravati@gmail.com
Website:- https://amravati.gov.in

दिनांक-23/9/2025

क्र.कक्ष-8/मा.अ./कावि 56 /2025

तात्काळ / महत्वाचे

प्रति,

1. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अमरावती.
2. मा. आयुक्त, महानगर पालिका, अमरावती
3. मा. पोलीस आयुक्त (अमरावती शहर), अमरावती.
4. मा. पोलीस अधिक्षक (अमरावतीग्रामीण), अमरावती.
5. मा. उपवनसंरक्षक, वन विभाग, अमरावती.
6. मा. अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती.
7. सह संचालक, तंत्र शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती
8. सहा. आयुक्त, समाजकल्याण विभाग, अमरावती.
9. अधिक्षक अभियंता, म.रा.विद्युत वितरण कंपनी, अमरावती.
10. अधिक्षक अभियंता,लघु सिंचन विभाग, अमरावती
11. अधिक्षक अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, अमरावती.
12. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती.
13. अधिक्षक अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती.
14. अधिक्षक अभियंता, विशेष प्रकल्प जलसंपदा अमरावती.
15. अधिक्षक अभियंता, पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण मंडळ, अमरावती
16. अधिक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती.
17. अधिक्षक अभियंता, निम्न वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती.
18. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, अमरावती.
19. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अमरावती.
20. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, अमरावती.
21. प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक परिवहन विभाग, अमरावती.
22. सहा. वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, अमरावती
23. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण संस्था (MHADA), अमरावती.
24. सह जिल्हा निबंधक (वर्ग-१) तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, अमरावती.
25. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती
26. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अमरावती.
27. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती.
28. जिल्हा शल्य चिकीत्सक अधिकारी, अमरावती.
29. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. अमरावती.
30. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, अमरावती.
31. जिल्हा क्रिडा अधिकारी, अमरावती.
32. प्रादेशिक व्यवस्थापक,एम.आय.डी.सी. अमरावती.
33. जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख, अमरावती.

34. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापण, अमरावती.
35. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जि.प. अमरावती.
36. गट विकास अधिकारी. ---------------- सर्व
37. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, अमरावती.

**विषय :- 28 सप्टेंबर हा दिवस "आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ:-** मा. उपसचिव,राज्य माहीती आयोग, खंडपीठ अमरावती यांचे पत्र क्रं /रामाआ .अमरावती / प्र. क्रं. 19/2025/आस्था/ 5567 दि. 09/09/2025 प्राप्त दि.22/09/2025

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मा. उपसचिव, राज्य माहीती आयोग, खंडपीठ, अमरावती यांचे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असुन पत्रात माहीती अधिकार अधिनियम , कलम 26 (1) (ख) खंड (क) अन्वये माहीती अधिकार अधिनियमाबाबत सर्वसामान्य लोकांमध्ये जनजागृती होणेसाठी दरवर्षी 28 सप्टेंबर हा दिवस माहिती अधिकार दिन म्हणुन साजरा करण्यात येतो. माहिती अधिकार प्रक्रिया तातडीची व सुटसुटीत असावी यासाठी अपिलार्थी सुध्दा जागरुक असणे गरजेचे आहे.माहीती अधिकार दिनानिमीत्य दरवर्षी जनजागृती मोहीम म्हणुन अमरावती जिल्ह्यातील सर्व कार्यालयाकडुन सामान्य जनतेस तसेच माहीती अधिकारात कार्य करीत असलेले कार्यकर्ते यांना माहिती मागण्याची पध्दती आणि शासकीय कर्मचारी व अधिकारी यांना माहिती अर्जास सकारात्मक प्रतिसाद देण्याच्या पध्दती याविषयी याविषयी जागरुक करणे गरजेचे आहे. माहिती अधिकार अधिनियम कायद्याच्या जनजागृती विषयी कार्यक्रम आयोजित करुन माहिती अधिकार दिन साजरा करणेबाबत. तसेच अमरावती जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, येथे देखील विद्यार्थ्यांच्या जनजागृती साठी कार्यक्रम आयोनित करण्याबाबत संबंधित शाळा, महाविद्यालये यांना अवगत करणे बाबत नमुद केले आहे.

तसेच माहिती अधिकार अधिनियम 2005चे कलम 4नुसार सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयामध्ये 17 मुद्दयांबाबत माहिती तसेच कार्यालयाशी संबंधित प्रदर्शित करण्यायोग्य सर्व माहीती कार्यालयाच्या संगणक संकेतस्थळावर प्रदर्शित करणेबाबत सर्वोच्च न्यायालयानेही आदेशित केले आहे.त्यानुसार कार्यालयाचे जनमाहीती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची नावे व पदनाम दर्शविणारे फलक लावण्याबाबत तसेच सदर फलक वेळोवेळी अद्यावत केले जात नाही असे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. तसेच शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कलम 4 बाबत माहिती प्रत्येक वर्षी 1 जानेवारी व 1 जुलै दरम्यान अद्यावत करण्याबाबतही निर्देशीत करण्यात आले आहे. त्याबरोबर माहीती अधिकार अर्जावर अपिलार्थी यांनी आपला भ्रमणध्वनी, ई- मेल आयडी टाकावे अशी सुचना करावी तसेच प्रत्येक प्राधिकारणाने माहीती अर्जावर कार्यवाही करताना नाव, पदनाम , कार्यालयाचा पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक. इ. नमुद करुन पत्रव्यवहार करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच माहीतीचा अर्ज भरणेबाबत अपिलार्थीस सुलभ होईल अशा मार्गदर्शनपर सुचना कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावण्यात याव्यात. याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत.

प्रत्येक वर्षी 28 सप्टेंबर रोजी माहितो अधिकर दिन साजरा करण्यात येतो. माहिती अधिकार दिनानिमीत्य दरवर्षी जनजागृती मोहिम म्हणुन आपल्या कार्यालयाकडुन कार्यवाही करण्यात यावी . माहिती अधिकार दिवस हा सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी (रविवार) येत असल्याने सदर दिवस अगोदरच्या कार्यालयीन दिवशी किंवा नंतरच्या कार्यालयीन दिवशी साजरा करावा.

सदर पत्राच्या अनुषंगाने आपण आपले स्तरावर व आपल्या अधिनस्त असलेल्या संस्था, कार्यालये, विभाग इत्यादींना कळवून सदर कार्यक्रम आयोजित करावे. तसेच संबंधित विभागाकडून आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचा अनुपालन अहवाल तात्काळ या कार्यालयास न चुकता सादर करावा.

सहपत्र – संदर्भ पत्र

निवासी उपजिल्हाधिकारी अमरावती

प्रतिलिपी :-

1. मा.विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
2. मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुबई ४०० ०३२ यांना माहितीकरीता सविनय सादर.
3. कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांना माहितीकरीता.

निवासी उपजिल्हाधिकारी अमरावती

माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती.

शासकीय विश्रामभवन जवळ, कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२.
दुरध्वनी क्रमांक-:०७२१-२५५२१७३,
ई-मेल.- dsmsicamwt@gmail.com
वेबसाईट:- sic.maharashtra.gov.in

क्र.रामाआ/अमरावती/प्र.क्र.११/२०२५/आस्था/५५६७
दिनांक :- ०९/०९/२०२५.

तातडीचे

संदर्भ/वाचा :- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक केमाअ २००८/ प्र.क्र.३७८/०८/सहा, दिनांक २०/०९/२००८

प्रति,

१. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.
२. विशेष पोलीस महानिरिक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.
३. कुलगुरु, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती.
५. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती.
६. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती.
७. मुख्य वनसंरक्षक आणि क्षेत्रसंचालक, व्याघ्र प्रकल्प मेळघाट, अमरावती.
८. मुख्य वनसंरक्षक कार्य आयोजना, अमरावती.
९. मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती.
१०. जिल्हाधिकारी, अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम.
११. पोलिस आयुक्त, अमरावती शहर, अमरावती.
१२. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
१३. ग्रुप कमान्डर, राष्ट्रीय छात्र सेना, गट मुख्यालय, अमरावती.
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम.
१५. आयुक्त, महानगरपालिका, अमरावती/ अकोला.
१६. पोलिस अधिक्षक, अमरावती/अकोला//बुलडाणा/यवतमाळ/वाशिम.
१७. अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती.
१८. समादेशक, राज्य राखीव पोलिस बल, गट क्र.९ अमरावती.
१९. पोलिस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, परिक्षेत्र, अमरावती.
२०. विशेष कार्यकारी अधिकारी, डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ विकास प्रशिक्षण, प्रबोधिनी, अमरावती.
२१. विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती.
२२. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अमरावती.
२३. अधिक्षक अभियंता, दक्षता पथक, जलसंपदा विभाग, अमरावती परिमंडळ, अमरावती.
२४. अधिक्षक अभियंता, ऊर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, शिवाजी नगर, अमरावती
२५. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती.
२६. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती.
२७. उपसंचालक, भूमी अभिलेख कार्यालय, अमरावती.
२८. सहसंचालक, उद्योग संचालनालय, अमरावती.
२९. उपसंचालक (आरोग्य सेवा), उपसंचालक कार्यालय, आरोग्य विभाग, अकोला.
३०. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, अमरावती.
३१. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती.
३२. उपसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग/ शालेय शिक्षण विभाग, अमरावती.
३३. प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अमरावती.
३४. मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण), अकोला.
३५. उप संचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, डॉ. सुधा देशमुख यांचा दवाखान्याजवळ, मांगीलाल प्लॉट, ईर्विन चौक, कॅम्प रोड, अमरावती.

स्वाक्षित प्राप्त
11 SEP 2025
मा. प्र.
जिल्हाधिकारी कि.प्र.शि. अधिक्षक हिंदी अधिकारी

३६. जिल्हा माहिती अधिकारी, विभागीय माहिती कार्यालय, डॉ. सुधा देशमुख यांचा दवाखान्याजवळ, मांगीलाल प्लॉट, इर्विन चौक, कॅम्प रोड, अमरावती.

**विषय :- दि. २८ सप्टेंबर हा दिवस "आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करणेबाबत.**

उपरोक्त विषयावरील संदर्भाधिन शासन निर्णयाचे कृपया अवलोकन व्हावे. (प्रत संलग्न)

माहिती अधिकार अधिनियम, कलम २६ (१) (ख) खंड (क) अन्वये माहिती अधिकार अधिनियमाबाबत सर्वसामान्य लोकांमध्ये जनजागृती होणेसाठी दरवर्षी २८ सप्टेंबर हा दिवस माहिती अधिकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. माहिती अधिकार प्रक्रिया तातडीची व सुटसुटीत असावी यासाठी अपिलार्थी सुध्दा जागरुक असणे गरजेचे आहे. त्यासाठी आपल्या स्तराबर माहिती अधिकाराबाबत जनजागृती होणे आवश्यक आहे.

त्यासंदर्भात आपल्या कार्यालयाकडून तसेच आपल्या अधिनस्त कार्यालयाकडून सामान्य जनतेस तसेच माहिती अधिकारात कार्य करीत असलेले कार्यकर्ते यांना माहिती मागण्याची पध्दती आणि शासकीय कर्मचारी व अधिकारी यांना माहिती अर्जास सकारात्मक प्रतिसाद देण्याच्या पध्दती याविषयी जागरुक करणे गरजेचे आहे. माहिती अधिकार दिनानिमित्त आपल्या कार्यालयामार्फत माहिती अधिकार अधिनियम कायद्याच्या जनजागृती विषयी कार्यक्रम आयोजित करुन माहिती अधिकार दिन साजरा करण्यात यावा तसेच आपल्या अधिनस्त कार्यालयात येणारे शाळा, महाविद्यालये येथे देखील विद्यार्थ्यांच्या जनजागृती साठी कार्यक्रम आयोजित करण्याबाबत संबंधीत शाळा, महाविद्यालये यांना अवगत करावे.

याशिवाय माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४ अनुसार सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयामध्ये १७ मुद्यांबाबत माहिती तसेच कार्यालयाशी संबंधीत प्रदर्शीत करण्यायोग्य सर्व माहिती कार्यालयाच्या संगणक संकेतस्थळावर प्रदर्शीत करणे याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयानेही आदेशीत केले आहे. त्यानुसार आपल्या कार्यालयाचे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची नावे व पदनाम दर्शविणारे फलक लावणे आवश्यक आहे. मात्र सदर फलक एकदा लावल्यानंतर वेळोवेळी अद्यावत केले जात नाही असे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने संबंधीतांना निर्देशीत करण्यात यावे.

आयोगाच्या निदर्शनास आले आहे की, कलम ४ अनुसार माहिती वेळोवेळी अद्ययावत करण्यात येत नाही. शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनूसार कलम ४ बाबत माहिती माहिती प्रत्येक वर्षी १ जानवारी व १ जुलै दरम्यान अद्ययावत करण्याबाबतही निर्देशीत करण्यात यावे.

तसेच माहिती अधिकार अर्जावर अपिलार्थी यांनी आपला भ्रमणध्वनी, ई-मेल आयडी टाकावे अशी सूचना करावी तसेच प्रत्येक प्राधिकरणाने माहिती अर्जावर कार्यवाही करताना नाव, पदनाम, कार्यालयाचा पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक/दुरध्वनी क्रमांक, ई-मेल इ. नमूद करुन पत्रव्यवहार करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच माहितीचा अर्ज भरणेबाबत अपिलार्थीस सुलभ होईल अशा मार्गदर्शनपर सूचना कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावाव्यात.

प्रत्येक वर्षी २८ सप्टेंबर रोजी माहिती अधिकार दिन साजरा करण्यात येतो. माहिती अधिकार दिनानिमित्त दरवर्षी जनजागृती मोहीम म्हणून आपल्या कार्यालयाकडून कार्यवाही करण्यात यावी व माहिती अधिकार दिन साजरा करण्याबाबत आपल्या अधिनस्त कार्यालयास कळवावे. या परिपत्रकाच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयाकडून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या आयोगास सादर करण्यात यावा.

**माहिती अधिकार दिवस हा सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी (रविवार) येत असल्याने सदर दिवस अगोदरच्या कार्यालयीन दिवशी किंवा नंतरच्या कार्यालयीन दिवशी साजरा करावा.**

सदर पत्र मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ अमरावती यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

आपला,

(देविसिंग इ. डाबेराव)
उप सचिव, राज्य माहिती आयोग,
खंडपीठ अमरावती.

प्रत — निवडनस्ती